MO.9860898564
अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक – दिपक थोरात


आज घाटापिपरी येथे वट पोर्णिमा असल्यामुळे वडाला औक्षण करताना महिलांची घेतलेली छायाचित्र छाया सुरेश कांबळे

बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष –०१ | अंक –२६८ | शुक्रवार दि.२१ जुन २०२४ | आरएनआय –एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४
Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-01 | Issue -268 | FRIDAY DT. 21 JUNE 2024 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

# बीड नगर परिषदच्या मुख्य अधिकारी नीता अंधारे, उपअभियंता न. प बांधकाम विभाग किरण देशमुख ५० ते ६० कोटी रुपयांच्या बीड शहरातील सिमेंट रोड नाली रस्ते दलित वस्ती व जनरल फंड निधी खर्चावर उत्तर देतील का?

## बीड नगरपरिषदे कडून कायमच किरण देशमुख टाळके वादग्रस्त ठरलेलेच?



- ५० ते ६० कोटी रुपये बीड नगरपरिषदकडून नाल्यावर नाल्या रस्त्यावर रस्ते फक्त कागदावर दाखवूकडून बीड नगरपरिषद लुटण्याचे काम जोरात?
- बीड नगर परिषद मुख्याधिकारी नीता अंधारे यांच्याकडून जनरल बिलं काढण्याचा धडाका सुरू
- बीड शहरातील अनेक भागांमध्ये रस्त्यावर रस्ते नाल्यावर नाल्या दाखवून नगरपरिषद मुख्याधिकारी नीता अंधारे किरण देशमुख यांच्याकडून बिल उचलण्याचा धडाका अंधारात काही सुरच?



### बीड नगरपरिषदेच्या मुख्यधीकारी अंधारे यांच्या अनागोधी कारभाराच्या भ्रष्टाचाराची चौकशी करण्यात यावी–, शिंदे, निसर्गध, मुजमुले, वडमारे

बीड /प्रतिनिधी

नगरपरिषद अंधारातच नगर परिषदेच्या मुख्य अधिकारी नीता अंधारे या जनरल बिल काढण्याचा धडाका सुरू केलेला आहे. याचाच एक भाग म्हणून मुख्याधिकारी नीता अंधारे यांनी बीड नगर परिषदेमध्ये महायुतीच्या अनेक नेते मंडळींनी सत्ताधाऱ्यात नेते मंडळीचा राजकीय वरदहस्त लाभलेल्या बीड जिल्ह्याच्या नेते मंडळींनी सुमारे ५० ते ६० कोटी रुपये आणून बीड शहरातील रस्ते नाली व वेगवेगळ्या योजना वरती खर्च करत दाखवले आहे त्यांना पोचण्याचे काम बीड नगर परिषदेचे किरण देशमुख व नीता अंधारे यांनी केलेले आहे. परंतु असा रुपयाचा खर्च कुठेही झालेला दिसून येत नाही. गेल्या एक दीड वर्षातील विकास आणि या एक वर्षातील विकासाचा हिसाब बीड नगर परिषद मुख्याधिकारी नीता अंधारे यांनी जनतेसमोर मांडावा आणि एकूण आलेला निधीचा आकडा जाहीर करावा यामध्ये वेगवेगळ्या टेंडरच्या माध्यमातूनकोणकोणत्या कंट्रक्शनला धरून टक्केवारीच्या माध्यमातून कोट्यावधी रुपयाचा निधी हा बीड नगर परिषदेचे मुख्य अधिकारी नीता अंधारे व टाळके, किरण देशमुख यांच्या सहगुतेदारांनी फस्त केला आहे. उप अभियंता न.प बांधकाम विभाग बीडचे किरण देशमुख यांनी बीड शहरातील एकूण किती व कोणकोणत्या प्रभाग वार्डत केला आहे व सर्व प्रभाग मधील केलेला सिमेंट रोड नाली तसेच नाल्यांची स्वच्छता सह वेगवेगळ्या टेंडर मध्ये ५० ते ६० कोटी रुपयांचा भ्रष्टाचार या नगरपरिषदेतून करण्यात आलेला आहे. उप अभियंता न. प किरण देशमुख यांनी बीड नगर परिषदेतील प्रभागातील विकास कामावरती निधी खर्च झालेल्या ची माहिती जनतेसमोर मांडावी तसेच दलित वस्तीचे कोट्यावधी रुपये हे एकाच गल्लीमध्ये वापरत ज्या ठिकाणी दलित वस्ती नाही त्या ठिकाणी दलित वस्तीचा नाधी त्यांनी वापरून भ्रष्टाचार केल्याचा जनतेच्या तोंडून ऐकायला मिळत आहे. यावेळी बीड शहरातील जनता ही बीड नगर परिषदेच्या सुविधांपासून वंचित राहिलेली आहे. सुमारे ५० ते ६० कोटी रुपयांचा निधी हा फक्त बीड शहरातील नाल्या रोड करण्यामध्ये कसा वापरला जाऊ शकतो याच कारण रोडवर रोड आणि नाल्यावर नाल्या दाखवून फक्त कागदावरच अंधारामध्ये बिल उचलण्याचा काम यावेळी नगर परिषदेच्या मुखधिकारी नीता अंधारे, किरण देशमुख व संबंधित कंट्रक्शन करत आहेत. याचा लवकरच भांडाफोड पुढील अंकामध्ये करणार आहोत?

नगरपरिषदेतील बांधकाम विभागत व इतर सर्वच विभागात बोगस व बायपास बील काडून सबंधित विभागातील अधिकारी यांना टक्केवारी देऊन फक्त कागदावरच कामे दाखावून बील उचलले जात आहेत.

२) मागील वर्षातील उझऊ, दलीत वस्तीतील मंजूर झालेली कामे न करताच फक्त कागदपत्री दाखवून बील उचलली आहेत माञ हा सर्व प्रकार मुख्याधिकारी, बांधकाम उपअभियंता किरण देशमुख व पाणी पुरवठा विभागाचे उपअभियंता टाळके तसेच कन्ट्रक्शन यांच्या संगण मताने करून दलीत वस्तीतील कामे करण्यास जाणून–बुजून टाळाटाळ केली जाते.

३) नगरपरिषदेतील पाणी पुरवठा विभागाचे जबाबदार अधिकारी उपअभियंता टाळके साहेब हे पाणी पुरवठा विभागातील कर्मचारी याच्या पगारी करत नसल्याने पाणी पुरवठा विभागाचे नियोजन पूर्ण पणे ढासळले असून शहरात महिन्याला एकदा पाणी सोडले जाते त्यामूळे शहरातील नागरिकांकडून संताप व्यक्त केला जात आहे. तसेच शहरात घाणीचे साम्राज्य थयमान घालत असून शहरात ठिकठिकाणी कचरा आणि घाणीची दुर्गंधी पसरली आसून यामुळे शहरातील वयवृध्द व लहान मुलाना आजाराला सामोरे जावे लागत असल्याने शहरातील बाल रुग्णालय आणि खासगी दवाखाने मात्र गच्च भरले आहेत यासाठी नगरपरिषद मुख्याधिकारी व पाणीपुरवठा उपअभियंता टाळके तसेच बांधकाम अभियंता किरण देशमुख जबाबदार आहेत.

याचे कारण हेच की नागरिक कोमात आणि अधिकारी जोमात अशी आहे. तसेच नगरपरिषदेत टक्केवारी आणि काळा पैसा घेता येत नसल्यामुळे बांधकाम विभागचे उपअभियंता किरण देशमुख व पाणी पुरवठा विभागांचे उपअभियंता टाळके तसेच सर्वच विभागाचे अधिकारी हे खासगी ऑफिस टाकून तेथून नगरपरिषदेचा कारभार पाहतात जेणे करून टक्केवारी घेता येईल आणि काळा पैसा जमा करता येईल.

तरी मा. जिल्हाधिकारी साहेब यांना विनंती कारण्यात येते की, १५ दिवसाच्या आत आमच्या तक्रारीची दखल घेण्यात यावी अन्यथा विभागीय आयुक्त कार्यालय संभाजीनगर येथे ठिय्या आंदोलन करण्यात येईल असा इशारा देण्यात आला. या वेळी अनिल निसर्गण,नितीन मुजमुले,हर्षेद वडमारे करणार आहेत.


आज दिनांक २१ जून रोजी मराठी संस्कृतीची प्रतिमा जपत सत्यवानासाठी सावित्रीचा वसा पुढे चालवत सौभाग्यवतीने वटवृक्षाचे लागवड करून सात जन्माची साथ आणि सौभाग्याची प्रार्थना करून वटवृक्षाचे पूजन केले

# खरीप हंगाम २०२३ चे दुष्काळी अनूदान साठी वचिंत शेततक-यानी तात्काळ के वाय सी करा तहसील कार्यालयाचे अवाहण

किल्लेधारूर । प्रतिनिधि

२०२३ चे खरीप हंगामात गंभीर दुष्काळ पडल्याने शेतक–याचे मोठे नुकसान झाले होते शासनाने या शेतक–याना नुकसान भरपाई म्हणूण दुष्काळी अनूदान जाहीर केले के वाय सी न केल्याने व इतर कागदपत्र न दिल्याने धारुर तालूक्यातील ४९९५ शेतकरी अद्याप या अनूदाना पासून वंचित आहेत त्यांनी तात्काळ प्रक्रिया पुर्ण करावी असे अवाहण तहसीलदार जिवकुमार कांबळे यांनी केले आहे




खरीप हंगाम २०२३ दुष्काळ मध्ये पडलेल्या गंभिर दुष्काळा मुळे शेतक–याची पुर्ण पिके हातची गेली होती शेतकरी हतबल झाला होता मात्र राज्य शासनाने दुष्काळी अनूदान देण्याची घोषणा केली होती हे अनुदान तात्काळ वाटप करण्याचे सुचना मागील दोन महीण्या पासून होत्या धारूर तालूक्यात तहसील कार्यालयाने तत्परतेने कारवाई करून अंतिम बाधित शेतकरी संख्या ३५९४१ या मध्ये अपलोड शेतकरी संख्या–३३९९८ पुर्ण केले शेतक–याना के वाय सी करण्याचे अवाहण केले या शेतक–याना अनूदान खात्मा वर वर्ग केले. तालुक्यात के वाय सी प्रलंबित संख्या एकूण–४९९५. असून, शिल्लक अपलोड संख्या–१९४३, अपलोड शेतकरी संख्या टक्केवारी ९४.५९ आहे तालुका धारूर खरीप हंगाम २०२३ दुष्काळ अनुदान वाटप बाबत वेळोवेळी सूचना करूनही काही शेतकरी अद्याप आवश्यकती कागदपत्र संबधित तलाठी यांचे कडे दाखल केलेली नाहीत त्यामुळे त्यांची नावे ऑनलाइन यादीत आप्लोड करणे बाकी आहेत. तसेच ऑनलाईन अपलोड नंतर प्राप्त झालेली व्हि के यादी तलाठी मार्फत गावात प्रसिद्ध करूनही अद्याप काही शेतकर्यांनी के वाय सी केलेली नाही . दुष्काळ अनुदान राहिलेल्या शेतकऱ्यांनी आवश्यक ती कागदपत्र आपल्या गावचे तलाठी यांचे कडे तात्काळ जमा करावीत तसेच व्हि के यादीतील राहिलेल्या शेतकऱ्यांनी तात्काळ के वाय सी करून घ्यावी असे आव्हान तहसीलदार जिवकुमार कांबळे व नायब तहसीलदार प्रकाश गोपड यांनी केले आहे

# राष्ट्रीय महामार्गाची दुरावस्था झाल्याने एसटी ची सेवा बंद

शेवगाव(प्रशांत बाफना)

पैठण – पंढरपूर या राष्ट्रीय महामार्गावर येणाऱ्या पैठण (मुंगी फाटा) ते पैठण उजव्या कालव्यावरील बोरगाव फाटा या दरम्यान असणाऱ्या मार्गाची ठिक ठिकाणी दुरावस्था झाल्याने पैठण आगाराची औरंगाबादहून शिरूर (कासार )पर्यंत सुटणारी बस बंद झाल्याने या मार्गांवरील भाविक भक्तांसह प्रवाश्यांचे मोठ्या प्रमाणात हाल होताना दिसून येत आहे.श्री संत एकनाथ महाराज यांचा प्रत्येक वर्षी आषाढी एकादशी निमित्त पायी पालखी सोहळा औरंगाबाद,अहमदनगर, बीड व सोलापूर या चार जिल्ह्याच्या हद्दीतून शेकडो वर्षापासून जात असून जवळपास २८५ कि.मी.अंतर असणाऱ्या या मार्गास केंद्रीय दळण – वळण व रस्ते मंत्री ना.नितीन गडकरी यांनी ७५२ ई. प्रमाणे राष्ट्रीय महामार्गाचा दर्जा देऊन



या महामार्गच्या कामासाठी निधीही मंजूर करून दिला होता.त्यास जवळपास ४ वर्षाचा कालावधी उलटूनही या मार्गाचे काम अजूनही पूर्ण न झाल्याने व जे काम करण्यात आले आहे.त्यात ही झालेल्या काही कामाचे टप्पे टप्पे पडले असून सततच्या वाहनांच्या वर्दळीमुळे कच्चे काम अनेक ठिकाणी उखडले आहे. व सध्या पावसाळ्याचे दिवस असल्याने थोडचा फार पडलेल्या पावसामुळे महामार्गांवर अनेक ठिकाणी मोठं मोठे खड्डे पडून त्यामध्ये पावसाचे पाणी साचल्याने पैठण आगाराने खड्ड्याचे कारण पुढे करून शिरूर कासारकडे जाणारी एसटी ची सेवा बंद केली असून लाडजळगाव, शेकटे, बोधेगाव, हातगाव, मुंगी व कांबी या गावातील नागरिकांना त्याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

# राजापुर येथे गळफास घेऊन विवाहित महिलेची आत्महत्या ?

## नातेवाईकांच्या दबावापुडे तलवाडा पुलीस हातबल; शेवटी गुन्हा दाखल करावाच लागला!

गेवराई ।प्रतिनिधी

गेवराई : तलवाडा पोलिस स्टेशनच्या हाद्दीत राजापुर शिवारातील स्वतःच्या शेतात गळफास घेवून एका विवाहित महिलेने आत्महत्या केल्याची घटना आज सकाळी राजापुर येथे घडली. पती पत्नीमध्ये झालेल्या वादानंतर तिने हे पाऊल उचलल्याचे सांगितले जात आहे. मात्र मुलीला आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा आरोप करत माहेरकडील नातेवाईकांनी गुन्हा दाखल होत नाही तोपर्यंत मृतदेह ताब्यात घेणार नाही असा पावित्रा घेतला होता. नातेवाईकांच्या दबावापुडे आखेर



तलवाडा पोलिसांना हातबल होत गुन्हा दाखल करावाच लागल्याचे बोलल्या जात आहे. या बाबत अधिक माहिती अशी की गेवराई तालुक्यातील राजापुर येथील सुनिता ठकाराम बेडके (वय ३५ रा. राजापुर) हिने आज सकाळी स्वतःच्या शेतात गळफास घेवून आत्महत्या केल्याची घटना घडली. घटनेची माहिती कळताच ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेतली. तलवाडा पोलीस देखील घटनास्थळी दाखल झाले होते. विवाहीतेच्या आत्महत्येनंतर संतप्त नातेवाईकांनी तलवाडा पोलिस ठाण्यात गर्दी करत गुन्हा दाखल होत नाही तोपर्यंत मृतदेह ताब्यात घेणार नाही अशी भुमिका घेतली होती. शेवटी तलवाडा पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सोमनाथ नरके यांनी गुन्हा दाखल झाला असल्याचे सांगितले

# विधानसभेच्या अगोदर धनगर समाजाच्या आरक्षणाचा प्रश्न सोडवला नाही तर सत्ताधाऱ्यांना ताकद दाखवून देऊ-दत्ता वाकसे

## धारूर तालुक्यातील लिंबला येथे अहिल्यादेवी होळकर जयंती उत्सव साजरी..!

बीड/प्रतिनिधी

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या २९९ व्या जयंतीनिमित्ताने बीड जिल्ह्यातील धारूर तालुक्यातील लिमला येथे ग्रामस्थांच्या माध्यमातून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीच्या आयोजन करण्यात आले होते याप्रसंगी मनोगत व्यक्त करताना शेपर्ड इंडिया इंटरनॅशनल संघटनेचे राष्ट्रीय उपाध्यक्ष दत्ता वाकसे यांनी म्हटले आहे की विधानसभेच्या अगोदर राज्यातील दोन नंबरचा असलेला धनगर समाजाच्या एसटी अवस्थेत जमातीच्या आरक्षणाचा प्रश्न सोडवला नाही तर सत्ताधाऱ्यांना ताकद दाखवून देऊ

सध्या परिस्थिती पाहिली तर महाराष्ट्र राज्यातील धनगर समाजाच्या वाट्याला अन्याय आलेला दिसत आहे धनगर समाज या राज्यातील दोन नंबरचा म्हणजे मराठा समाजाच्या नंतर राज्य करणारी जमात म्हणून ओळखला जायचा परंतु या समाजाची मोठ्या प्रमाणात लोकसंख्या असतानाही हा समाज आजही राजकीय दृष्ट्या अतिशय मागास असून या समाजाला म्हणाव त्या प्रमाणात राजकीय प्रतिनिधित्व मिळाले नाही ९९ ते २००४ दरम्यान हा समाज राजकीय दृष्ट्या अतिशय बलवान होता आमदारांची संख्या १८ च्या आसपास होती परंतु मधल्या काळात २००४ च्या नंतर माधव कार्ड माळी धनगर वंजारी असा पॅटर्न राज्यामध्ये भाजपच्या माध्यमातून झाला आणि या समाजाच्या राजकीय



प्रतिनिधित्वावर अक्षरशा मोठा गदा फिरला आणि या समाजाच्या आमदार संख्या नगण्य अवस्थेत झाली आहे आज पाहता राज्यामध्ये पाच कोटी कोटी असलेल्या धनगर समाजाचा एक आमदार आहे ही शोकांतिका नाही का? त्यामुळे आगामी काळामध्ये धनगर समाजाने लोकसभा निवडणुकीमध्ये भाजपला आसमान दाखवले आहे तर इकडे महाविकास आघाडीच्या पारड्यामध्ये पश्चिम महाराष्ट्राचा विदर्भात खानदेश मराठवाडा काही भागात मोठ्या प्रमाणात मताचे मतदार संघ असलेल्या मतदारसंघांमध्ये धनगर समाजाने मोठ्या प्रमाणात महाविकास आघाडीच्या उमेदवाराच्या पारड्यामध्ये मते दिलेली आहेत त्यामुळे माधव पॅटर्न मोडीत निघाला की काय? अशी परिस्थिती आहे आज पाहता या राज्यामध्ये धनगर समाज मोठ्या संख्येने असताना व ७४ मतदारसंघ असे आहेत की त्या मतदारसंघांमध्ये धनगर समाजाने धनगर समाजाला मतदान केले तरी ७४ आमदार होऊ शकतात परंतु हा समाज विखुरला गेलेला आहे त्यामुळे आगामी काळात या समाजाने आपले कोण आणि परके कोण? याचा विचार करून आपलीच माणसं विधिमंडळामध्ये पाठवणं काळाची गरज आहे त्यामुळे विधानसभा निवडणुकीच्या माध्यमातून धनगर समाजाने भरभरून मते देऊन आपल्याच माणसाला विधिमंडळात पाठवायचे आहे असे देखील बोलताना शेफर्ड इंडिया इंटरनॅशनल संघटनेचे राष्ट्रीय उपाध्यक्ष दत्ता वाकसे यांनी धारूर तालुक्यातील लिमला येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंती निमित्ताने मनोगत व्यक्त करताना भावना व्यक्त केल्या याप्रसंगी ग्रामस्थ महादेव नरवटे,विशाल नरोटे, बळीराम व्हरकटे,शनिदेव व्हरकटे, गोविंद म्हात्रे, अखिल कोठुळे, बाबा नरोटे यासह राजकीय सामाजिक क्षेत्रातील मान्यवर ग्रामपंचायत सदस्य सोसायटीचे सदस्य चेअरमन आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते

## साखरपुडा झाल्यानंतर तिसऱ्या दिवशीच तरुणीची गळफास लावून आत्महत्या

### गेवराई तालुक्यातील जातेगाव येथील घटना!

गेवराई ।प्रतिनिधी

गेवराई : साखरपुडा झाल्यानंतर तिसऱ्याच दिवशी तरुणीने राहत्या घरातील लोखंडी आडूला गळफास घेवून आत्महत्या केल्याची दुर्देवी घटना बुधवारी (दि. १९) रात्री जातेगाव येथे घडली. भूमिका देविदास कारके (वय २०) रा. जातेगाव, ता. गेवराई असे आत्महत्या केलेल्या तरुणीचे नाव आहे. सदरील तरुणीचा विवाह निश्चित झाल्याने (ता. १६) मृत भूमिका हिच्या घरी साखरपुडा करण्यात आला होता.

मात्र, साखरपुड्यानंतर होणारा पती पृथ्वीराज सुतार, सासरा मोतीलाल सुतार, सासू मिराबाई सुतार (रा. गेवराई जि. बीड) हे वारंवार फोन करून संबंधीत तरुणीला तुझ्या आई वडिलांकडून व्यवसायासाठी तीन लाख रूपये घेवून दे, अशी मागणी करत लग्न तोडण्याची आणि बदनामीची धमकी देत होते.


या धमकीला आणि त्रासाला कंटाळून भूमिकाने आत्महत्या केल्याची तक्रार सत्यभामा कारके यांनी गुरुवार (दि. २०) रोजी दिली. यावरुन पोलीसांनी होणारा पती व त्याचे आई वडिल यांच्याविरूध्द आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला असल्याची माहीती सहायक पोलीस निरीक्षक सोमनाथ नरके यांनी दिली. फौजदार स्वप्नील कोळी पुढील तपास करत आहेत.



## शहेनशानगर भागतील विद्युत दिवे दुरुस्त करून त्वरित चालु करा

**बीड – शहरातील शहेनशहानगर सामाजिक वनिकरण समोरील गल्लीत तीन महिन्यापासून विजेच्या खाबावर लाईट नसल्याने रमजान ईद व बकरी ईद अंधारात गेली, गल्लीला लागून मोठा नाला आहे पाऊस पडला कि नाला नदी सारखा तुडुंब भरून वाहतो. अंधारामुळे अनेक वाहने आणि माणसे, मुले नाल्यात पडतात.**

चोऱ्याचे प्रमाण अंधारात वाढले आहे,जीवघेणे स्वरूप अंधारामुळे येथे असते तरी नगर पालिका खांबा वरील दिवे त्वरित दुरुस्त करून सुरळीत करावे अनर्थ टाळावे व असे आव्हान खिदमत जणाधिकार सेवा भावी संस्था बीड यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे.



**योगदिन साजरा**

**अंबाजोगाई (प्रतिनिधी)**

**योगेश्वरी शिक्षण संस्था संचालित स्वा.रा.ति. महाविद्यालयात 'जागतिक योग दिनी' विद्यार्थ्यांसह कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला.संपूर्ण जगभरात २१ जून हा 'जागतिक योग दिन' म्हणून साजरा करण्यात येतो.सुरूवातीला योगाचे मानवी जीवनातील महत्त्व सांगण्यात आले पद्मासन, बद्धपद्मासन, तोलासन वज्रासन, सुखासन, वृक्षासन, शिर्षासन, शवासन यांसह विविधआसनप्रकार, सूर्यनमस्कार तसेच स्वास्थ्यासाठी आवश्यक असणारे कपालभाती, अनुलोम–विलोम, भ्रामरी इ. प्रकारचे प्राणायाम, ओंकार जप, ध्यानधारणा प्रात्यक्षिकांद्वारे माहिती दिली. योग दिनानिमित कर्मचाऱ्यांनी विविध प्रयोगाचे धडे यावेळी घेतले.कर्मचारी आदींनी सहभाग घेतला.**

# वसंत महोत्सवात होणार गोरबंजारा उद्योजकांचा सत्कार आणि सन्मान - उद्योजक रामशेठ राठोड

**वसंत महोत्सव ,माजलगाव बीड हरित क्रांतीचे प्रणेते ,आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार ,महानायक वसंतराव नाईक साहेब यांच्या जन्ममहोत्सवानिमित्त वसंत महोत्सवाचे राज्यभरात आयोजन करण्यात आले आहे .१ जुलै ते ३१ जुलै दरम्यान होणाऱ्या या वसंत महोत्सवाचा शुभारंभ १ जुलै रोजी सकाळी ११ वाजता माजलगाव (बीड,मराठवाडा ) येथे आयोजित करण्यात आला आहे .या वेळी वृक्षारोपण ,गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार ,विविध क्षेत्रात काम करणाऱ्या मान्यवरांचा सत्कार व पुरस्कार अशा कार्यक्रमांचे आयोजन तसेच वसंत व्याख्यान मालिकेचे आयोजन करण्यात आले आहे . तसेच यावेळी गोरबंजारा समाजातील उद्योजकांचही सत्कार सन्मान होणार असल्याचे मुंबई येथील उद्योजक तथा सामाजिक कार्यकर्ते रामशेठ राठोड यांनी कळवले आहे . गोरबंजारा सांस्कृतिक प्रदर्शन रॅली ,नाशिक ढोल–ताशा ,डपडा ,महिला नृत्य ,घोडा ,हत्ती रथ ,भजनी मंडळ ,असंख्य समाजबांधव ,धर्मगुरू यांसोबत महानायक वसंतराव नाईक साहेब यांच्या प्रतिमा रॅलीचे यावेळी आयोजन करण्यात आले आहे .**

**या कार्यक्रमासाठी गोरधर्म पिठाधीश्वर बाबूसिंग महाराज ,गोरधर्म पिठाचे धर्मगुरू महंत जितेंद्र महाराज,धर्मगुरू कबीरदास महाराज ,धर्मपीठ प्रवक्ता साहेबराव शास्त्री महाराज , अनिल महाराज,यांचे सह अनेक यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे . भगवंत सेवक किसनभाऊ राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम पार पडणार आहे .या कार्यक्रमाचे भव्य आयोजन राष्ट्रीय बंजारा सेवा संघ तर्फे उद्योजक तथा युवा नेते राजेशभैय्या राठोड व उद्योजक रामशेठ राठोड यांनी केले आहे .**

उद्योगपती राजेशभैय्या राठोड यांचा याच दिवशी वाढदिवस असून भव्य क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे .यावेळी भव्य रॅलीचे आयोजन केले असून त्यात वेशभूषा ,परंपरागत थाळी ,नंगारा नृत्यासह बंजारा महिलांचे सांस्कृतिक कार्यक्रम पाहायला मिळतील .ढोल ताशा , घोडे ,हत्ती व बैलगाडीतून बंजारा समाजाच्या लदेणीची वैभवशाली परंपरा व संस्कृतीचे दर्शन बघायला मिळणार आहे .वसंतराव नाईक यांच्या पुतळ्यावर पुष्पवृष्टी करण्यात येणार आहे . भव्य रॅली मार्ग छत्रपती संभाजी महाराज चौक ते वसंतराव चौक (माजलगाव ) असा असणार आहे .रॅलीच्या वेळी शहरात भव्य आतिषबाजी करण्यात येणार आहे तसेच छत्रपती शिवाजी महाराज व महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात येणार आहे . गोरविचार पीठावरुन वसंतराव नाईक यांच्या जीवनकार्याचा गौरव केला जाणार आहे .

महानायक वसंतराव नाईक यांच्या जीवनावर व्याख्यान माला आयोजित केली असून वक्त्यांनी आपली नावे कळवावी असे आवाहन राष्ट्रीय गोरबंजारा सेवा संघातर्फे करण्यात आले आहे .वसंतराव नाईक यांचे विचार तळागाळापर्यंत पोहोचावे व महानायक वसंतराव नाईक यांच्या विचारांवर समाजाची राजकीय इच्छाशक्ती प्रबळ व्हावी अशी इच्छा आयोजक राजेश राठोड यांनी व्यक्त केली . तेरा वर्षे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असलेल्या महानायक वसंतराव नाईक यांच्या कार्यापासून प्रेरणा घेत गोरबंजारा समाजाने आता राजकीय क्षेत्रात उतरले पाहिजे व मोठ्या प्रमाणात जिल्हापरिषद , पंचायतसमिती ते विधानसभेपर्यंत बंजारा समाजाचा आवाज घुमला पाहिजे असे मत भगवंतसेवक किसनराव राठोड यांनी व्यक्त केले .या कार्यक्रमांसाठी संपूर्ण राज्यातील प्रमुख लोकांची उपस्थिती असणार आहे . यासाठी गुणवंत विद्यार्थ्यांनी आपली नावे कळवावी ,व्याख्यान मालेमध्ये भाग घेणाऱ्या वक्त्यांनी आपली नावे कळवावी आणि विविध उपक्रमांसाठी समाजबांधवांनी आपली नावे कळवावीत असे आवाहन सुद्धा रामशेठ राठोड यांनी केले . १ जुलै २०२४ रोजी सकाळी ११ वाजता कार्यक्रमाचा शुभारंभ होईल .११ ते १ वृक्षारोपणाचा कार्यक्रम संपन्न होईल . १ वाजता नाईक साहेबांच्या प्रतिमेचे पूजन ,धर्मगुरूंच्या हस्ते सन्मान पुरस्कार व स्नेहभोजन असे आयोजन असेल . दुपारी २ पासून व्याख्यान माला सुरू होईल .सायंकाळी ५ वाजता विविध सांस्कृतिक कार्यक्रमांनी कार्यक्रमाची रंगत वाढवली जाईल . सायंकाळी ७ वाजता राज्यभर जयंतीमहोत्सव साजरे करण्यासाठी,वसंतराव नाईक यांच्या कार्याचा प्रकाश दूरवर पसरण्यासाठी भव्य आतिषबाजीचे आयोजन करण्यात आले आहे .साधारणतः सायंकाळी ७ वाजता भव्य आतिषबाजी करून कार्यक्रमाची सांगता करण्यात येणार आहे . युवा उद्योजक राजेशभैय्या राठोड यांचा वाढदिवस येथे केक कापून साजरा केला जाणार आहे . या कार्यक्रमाचा उत्साह संपूर्ण मराठवाड्यातून दिसून येत आहे . या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन राष्ट्रीय बंजारा सेवा समितीचे पदाधिकारी तथा आयोजक राजेश राठोड व उद्योजक रामशेठ राठोड यांनी यावेळी केले आहे .

# धारूरच्या महादुर्गात जागर प्रतिष्ठानकडून राज्याभिषेक साजरा

धारूर ।प्रतिनिधी

छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३५१ व्या राज्याभिषेक सोहळ्याचे आयोजन बीड जिल्ह्यातील ऐतिहासिक शहर असणाऱ्या धारूर येथील महादुर्ग किल्ल्यात जागर प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्याच्या वतीने करण्यात आले होते ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशी म्हणजेच २० जून व १९ जून असे दोन दिवस कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते त्यामध्ये १९ तारखेला गडावर स्वच्छता म्हणून राबविण्यात आली स्वच्छता मोहिमेसाठी धारूर शहरातील सर्व दुर्ग संवर्धक मोठ्या संख्येने उपस्थित होते तसेच, छत्रपती संभाजी महाराजांची जयंती साजरी करण्यात आली व संध्याकाळी गडावरील देवीच्या मंदिरात आरती व जागरण गोंधळाचा कार्यक्रम झाला व मशाल महोत्सव साजरा करण्यात आला संबळाच्या गजरात आणि मशालीचा प्रकाशाने गडावर अत्यंत उत्साह पूर्ण वातावरण निर्माण झाले होते.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाचे ३५० व्या वर्षाची पूर्ती झाली व ३५० वर्ष पूर्ण होऊन ३५१ वा राज्याभिषेक सोहळा जागर प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्याच्या वतीने धारूरच्या महादुर्गात साजरा करण्याचे आयोजन करण्यात आले २० जून रोजी सकाळी ठीक आठ वाजता गडाच्या मुख्य दरवाजाला तोरण बांधून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली त्यानंतर बीड जिल्ह्याच्या विविध भागातून आलेल्या पाच जोडप्यांच्या हस्ते महाराजांना विधिवत राज्याभिषेक करण्यात आला पंडितांच्या मंत्र उच्चारात व प्रसन्न वातावरणात राज्याभिषेक संपन्न झाल्याच्या नंतर , जागर प्रतिष्ठानच्या शिलेदारांनी महाराजांना ध्वजवंदना दिली व महाराजांची आरती करण्यात आली.

या कार्यक्रमासाठी महाराष्ट्राच्या विविध भागातून जागर प्रतिष्ठानचे शिलेदार उपस्थित होते त्यापैकी प्रमुख वक्त्यांनी उपस्थित त्यांना राज्याभिषेक सोहळ्याचे महत्त्व व जागर प्रतिष्ठानच्या कामाचे स्वरूप समजून सांगितले आणि ज्या पद्धतीने गेल्या चार वर्षांपूर्वी धारूरच्या महादुर्गात पहिल्यांदा दीपोत्सव सोहळा साजरा केला आणि गेली चार वर्षे झाले ती परंपरा अखंडपणे



सुरू आहे तशाच पद्धतीने धारूरच्या महादुर्गात इतिहासात पहिल्यांदाच राज्याभिषेक सोहळ्याच्या आयोजन करण्यात आले होते दीपोत्सवाप्रमाणेच यापुढे धारूरच्या महादुर्गात राज्याभिषेकाची परंपरा अखंडपणे चालवण्याचा प्रयत्न जागर प्रतिष्ठानच्या माध्यमातून केला जाईल असे जागर प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष किसन पाटील चव्हाण यांनी जागर परिवाराच्या वतीने सांगितले.

राज्याभिषेक सोहळ्याच्या या भव्य दिव्य कार्यक्रमांमध्ये गड परिसरात व धारूर शहरात आनंदाचे वातावरण निर्माण झालेले होते. कार्यक्रमासाठी सर्व शिलेदारांनी व धारूरच्या ग्रामस्थांनी खूप परिश्रम घेतले व हा कार्यक्रम यशस्वी केला कार्यक्रमासाठी धारूर शहरातील व परिसरातील शिवप्रेमी युवक , महिला, राजकीय, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते हा भव्य दिव्य सोहळा खूप उत्साहात पार पडला.

# जागतिक योग दिनानिमित्त दिला व्यसनमुक्तीचा संदेश



बीड ।प्रतिनिधी

भारताच्या राज्यघटनेतील अनुच्छेद ४७ मध्ये सार्वजनिक आरोग्य व जनतेच्या रक्षणासाठी मादक पदार्थावरील बंदीचे मार्गदर्शक तत्व समाविष्ट करण्यात आले आहे .भारत एक विकसनशील देश असून मनुष्यबळ ही त्याची संपत्ती आहे सदर मनुष्यबळातील युवाशक्ती ही राष्ट्र शक्ती आहे व्यसनाच्या वाढत्या प्रभावामुळे राज्याच्या आणि राष्ट्राच्या युवाशक्तीचा ऱ्हास होत असून व्यसनामुळे सामाजिक स्वास्थ बिघडत आहे या सर्व गोष्टीचा विचार करून व्यसनांचे संपूर्ण निर्मूलन करणे शक्य नसले तरी सदर व्यसनाला परिणामकारक आळा घालणे हे राज्याचे सामाजिक दायित्व आजच्या तरुण पिढीने योगा कडे लक्ष द्यावे व्यसनमुक्ती पासून दूर राहावे असे प्रतिपादन यावेळी तत्वशील कांबळे यांनी केले. समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद बीड, नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्य बीड, नेहरू युवा केंद्र बीड व राजर्षी छत्रपती शाहू महाराज प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने आज दिनांक २१ जून २०२४ रोजी सांस्कृतिक विद्यालय नगर रोड बीड या ठिकाणी व्यसनमुक्ती साठी योग या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते यावेळी प्रमुख म्हणून अरुणा कोचुरे जिल्हा युवा अधिकारी नेहरू युवा केंद्र बीड डॉ. दत्ता नलावडे योग प्रशिक्षक तथा संस्थापक संस्कृती विद्यालय बीड,तत्वशील कांबळे, बालाजी पवार , प्रमोद जव्हेरी ,ओमप्रकाश गिरी, शिक्षक वृंद व युवक विध्यार्थी उपस्थित होते.



# पाइपलाइनसाठी सिमेंट रस्ते खोदले; चिखलाने वाहनधारक त्रस्त


नेकनूर -बीड तालुक्यातील जलजीवन मिशन अंतर्गत १९ कोटीची पाणीपुरवठा योजना होत असुन सदरील पाईपलाईनचे काम करतांना गल्ली मधील सिमेंट रस्ते फोडून मधोमध पाईप टाकण्यात आले आहेत. चांगले रस्ते फोडल्याने सध्या पावसामुळे रस्त्यावर खिचल होवुन नागरिकांचे हाल होवु लागले आहेत. नेकनूर येथे जल जीवन मिशन अंतर्गत सध्या पाईपलाईनचे गल्ल्यात काम केले जात असुन त्यासाठी गावातील सिमेंट रस्ते फोडून रस्त्याच्या मधोमध पाईप टाकले जात आहेत. चांगले रस्ते फोडतांना जर रस्त्याच्या एका बाजुने पाईपलाईनसाठी जागा केली असती तर रस्ते वाचले असते. उकरलेले रस्ते व्यवस्थीत बुजवण्यात येत नाहीत. रस्त्यावर तशीच माती टाकून दिली जात आहे. त्यामुळे सध्या पाऊस झाली की अशा रस्त्यावर चिखल साचत असुन नागरिकांचे हाल होत आहेत. चिखल झाला असल्याने नागरिकांना दुचाकी व चारचाकी वाहने दारापर्यंत आणता येत नाही.

...अन्यथा पोलिसात तक्रार करणार

पाणीपुरवठा योजनेसाठी खोदण्यात आलेल्या रस्ते व्यवस्थीत बुजवले नसुन कंत्राट दाराच्या विरोधात पोलिसात तक्रार देणार आहोत खराब झालेले रस्ते व्यवस्थीत करावे अशी मागणी सरपंच उपसरपंच ग्रामपंचायत सदस्यांनी महाराष्ट्र जीवन प्राधीकरणाचे कार्यकारी अभियंता के.बी चिवरे यांच्याकडे केली आहे. असेच निकृष्ट दर्जाचे काम चालू राहिले तर आम्ही चालु पाईपलाईन ग्रामपंचायतच्या ताब्यात घेणार नाहीत, अशा इशारा नेकनूरचे उपसरपंच सचिन शिंदे यांनी दिला.

लोकशाही मार्गाने उपोषणाला बसणार दरम्यान नेकनूर ग्रामपंचायत सदस्य शेख अर्शद अनिसोद्दीन यांनी दि. १२ जून रोजी सरपंच कडे लेखी तक्रार देऊन तक्रारीत म्हटले की शिक्षक कॉलनी येथे सुरू असलेल्या पाईपलाईन साठी खोदलेल्या खड्ड्यांमुळे सर्वत्र चिखल झाला आहे. गाड्यां व पाय चालता देखील येत नाही. जर दोन दिवसात काय उपयोजना न केल्यास लोकशाही मार्गाने ग्रामपंचायत कार्यालय समोर उपोषणास बसण्याच्या इशारा यांनी दिलेल्या निवेदनात दिला आहे.

# पुढील ३-४ दिवस मुसळधार पावसाचा इशारा



## विदर्भात ऑरेंज, मराठवाड्यात यलो अलर्ट, मुंबई, ठाण्यासह कोकणातही पावसाची शक्यता

पुणे - पुढील तीन ते चार दिवसात राज्यात मुसळधार पावसाचा इशारा हवामान खात्याने दिला आहे. त्या पार्श्वभूमीवर हवामान खात्याकडून कुठे ऑरेंज तर कुठे यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. आज विदर्भातील काही जिल्ह्यात पावसाचा ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. तर मुंबई, ठाण्यासह मराठवाडा आणि उत्तर आणि पश्चिम महाराष्ट्रातील अनेक भागातही पावसाची शक्यता आहे.

विदर्भातील काही जिल्ह्यात ऑरेंज अलर्ट

हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, आज विदर्भातील काही जिल्ह्यात पावसाचा ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. या भागात आज अति मुसळधार पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. विदर्भातील गडचिरोली, यवतमाळ आणि अमरावती या जिल्ह्यांना पावसाचा ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. या पावसाच्या पार्श्वभूमीवर नागरिकानी योग्य ती खबरदारी घ्यावी असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

दरम्यान, आज कोकणासह पश्चिम महाराष्ट्रातील काही जिल्ह्यात पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. यामध्ये रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या जिल्ह्यांचा समावेश आहे. तसेच पुणे आणि सातारा जिल्ह्यांना देखील पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. त्याबरोबर मराठवाड्यातील काही जिल्ह्यांत पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, लातूरसह अन्य जिल्ह्यात मेघगर्जनेसह पावसाची शक्यता आहे.

# डोळ्यात अश्रू, ओबीसींच्या आंदोलनाकडे तुमचे पाय वळत नाहीत-वडेट्टीवार

## उपोषकर्ते हाके यांना भेटल्यानंतर मुख्यमंत्र्यांना केला फोन

आंदोलने सर्वांची समान असतात. एका आंदोलनाला एक न्याय, आणि दुसऱ्याला वेगळा न्याय मिळत आहे. ओबीसींच्या आंदोलनाकडे तुमचे पाय वळत नाहीत. मुख्यमंत्र्यांना आपण कळविले आहे. उद्या सरकारचे शिष्टमंडळ येणार आहे. हाऊसमध्ये अधिवेशनात हा मुद्दा मी स्वत: लावून धरणार असल्याचे विजय वडेट्टीवार यांनी सांगितले.

मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी गेली काही वर्षे आंदोलन सुरु असतानाच आता ओबीसी समाजानेही आक्रमक होत उपोषण सुरु केले आहे. ज्या मराठवाड्याच्या जालनातून मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी उपोषणाची सुरुवात केली आणि सरकारला धारेवर धरले त्याच जालनातील वडीगोद्री येथे ओबीसीचे नेते लक्ष्मण हाके आणि नवनाथ वाघमारे उपोषणाला बसले आहेत. या उपोषणस्थळावर जाऊन विरोधीपक्ष नेते विजय वडेट्टीवार यांनी लक्ष्मण हाके आणि नवनाथ वाघमारे यांना उपोषण सोडू नका पण निदान पाणी तरी प्या अशी विनंती करीत पाणी पाजले. त्यावेळी त्यांच्या डोळ्यातून अश्रू आले. यावेळी त्यांनी घटनास्थळावरुन व्यासपीठावरुनच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना फोन केला आणि उपोषणस्थळाला भेट देण्याची विनंती केली.





गेले अनेक दिवस ओबीसी नेते लक्ष्मण हाके आणि नवनाथ वाघमारे यांचे उपोषण सुरु आहे. त्यामुळे मराठा आंदोलनाला काऊंटर करण्यासाठी आता ओबीसी नेतेही आक्रमक झाले आहेत. या उपोषणस्थळावर नुकतेच भाजपा नेत्या पंकजा मुंडे आणि राष्ट्रवादीचे मंत्री धनंजय मुंडे यांनी देखील भेट दिली होती. आज विरोधी पक्ष नेते विजय वडेट्टीवार यांनी देखील उपोषण स्थळाला भेट देऊन लक्ष्मण हाके आणि नवनाथ वाघमारे यांच्या तब्येतीची विचारपूस केली. यावेळी त्यांच्या डोळ्यात अश्रू आले. त्यांनी तब्यतेची काळजी घ्या ओबीसी आरक्षणाला कुठंही धक्का लागणार

### आमच्या भावनेची कदर सरकारने करावी

डोक्यात असलेली आग आम्ही मांडू. या आंदोलनाला राजकीय स्वरूप आणू नका. धनगर समाजाला एसटी प्रवर्गामध्ये आरक्षण देऊ असे म्हणून २०१४ साली हे सरकार सत्तेत आले. दोन समाजाला झुलविण्याचे काम या सरकारने केले आहे. प्रकाश आंबेडकर जे बोलले ते सत्य आहे. ओबीसी आणि मराठा समाजाचे ताट वेगळे असावे असे प्रकाश आंबेडकर म्हणाले ते खरे आहे. याबाबत खोलवर अभ्यास करून सरकारने निर्णय घ्या. वरवरचा निर्णय घेवू नये. १२ बलुतेदार यांचा व्यवसाय हिरावला गेला आहे. तत्पूर्वी उपोषणकर्त्यांना त्यांनी उपोषणकर्त्यांना विनवणी केली की तुम्ही उपोषण सोडू नका, मात्र माझ्या हातून दोन घोट पाणी प्या. विजय वड्डेट्टीवर यांनी विनंती केल्यानंतर उपोषणकरत्यानी पाणी घेतलं.

## शक्तीपीठ महामार्गासाठी शेतकऱ्यांच्या समाधाना नंतरच भूसंपादनाची प्रक्रिया- मंत्री दादा भुसे

मुंबई |प्रतिनिधी

राज्यातील पवनार, जि. वर्धा ते पत्रादेवी जि. सिंधुदुर्ग या दरम्यान ८०२ कि.मी. लांबीचा शक्तीपीठ महामार्ग महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत होणार आहे. या महामार्गासाठी भूसंपादन करण्यापूर्वी प्रत्येक जिल्ह्यातील शेतकऱ्यांना विश्वासात घेतल्याशिवाय तसेच प्रत्येकांच्या अडी-अडचणी समजावुन घेतल्याशिवाय संबंधित भूसंपादन प्रक्रिया केली जाणार नाही. आवश्यकतेनुसार शेतकऱ्यांसमवेत बैठकांचे आयोजन करण्यात येईल. बागायत/जिरायत क्षेत्र, अल्पभूधारक शेतकरी, सदर महामार्गादरम्यान इतर रस्त्याची परिस्थिती काय आहे, या सर्व बाबींचा सखोल अभ्यास करुन व संबंधित शेतकऱ्यांचे समाधान केल्याशिवाय भूसंपादनाची प्रक्रिया करण्यात येणार नाही,असे




सार्वजनिक बांधकाम मंत्री (सार्वजनिक उपक्रम) दादा भुसे यांनी सांगितले.

महाराष्ट्र शक्तीपीठ महामार्ग महाराष्ट्रातील १२ जिल्ह्यांमधून जात असून पुढे गोवा राज्यामध्ये प्रवेश करणार आहे. १२ जिल्ह्यांमधील विविध देवस्थाने (संताची कर्मभूमी असलेले मराठीचे आद्यकवी अंबाजोगाईस्थित मुकुंदराज स्वामी, जोगाई देवी तसेच औंढा नागनाथ व परळी वैद्यनाथ येथील २ ज्योर्तिलिंग व महाराष्ट्राचे आराध्यदैवत पंढरपुर येथील विठ्ठल-रुक्मिणी मंदिरही जोडले जाणार आहेत. त्याचप्रमाणे कारंजा [illegible] माहूर, [illegible] गाणगापुर, नरसोबाची वाडी, औदुंबर [illegible] दत्त गुरुची धार्मिक स्थळे) जोडली जाणार आहेत. या महामार्गामुळे शेतकऱ्यांचा शेतीमाल व इतर सर्व दळण-वळण कमी वेळेत होईल, वेळेची तसेच इंधनाची बचत होईल व महामार्ग परिसराचा विकास होण्यास मदत होणार आहे.

सद्य:स्थितीमध्ये महाराष्ट्र शक्तीपीठ महामार्गासाठी प्रारंभिक अधिसूचना निर्गमित करण्यात आलेली असून संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांचेमार्फत भूसंपादनाची कार्यवाही करण्यात येत आहे. प्रस्तुत भूसंपादन प्रक्रियेबाबत खासदार अशोक चव्हाण व इतर अनेक शेतकऱ्यांच्या स्वाक्षरीचे निवेदन प्राप्त झाले आहे. सर्व बाबींचा सखोल अभ्यास करुन व संबंधित शेतकऱ्यांचे समाधान केल्याशिवाय भूसंपादनाची प्रक्रिया करण्यात येणार नाही, असे सार्वजनिक बांधकाम मंत्री (सार्वजनिक उपक्रम) दादा भुसे यांनी सांगितले.

## ओबीसी समाज एकत्रित आल्याने जरांगे यांच्या पाया खालची वाळू सरकली-बाळासाहेब सानप

### हातोला येथील उपोषणाला जय भगवान महासंघाचे अध्यक्ष बाळासाहेब सानप भेट

आष्टी / प्रतिनिधी

जालना जिल्ह्यातील ओबीसीचे नेते लक्ष्मण हाके यांच्या उपोषणला पाठींबा देण्यासाठी आष्टी तालुक्यातील हातोला येथील ग्रामस्थांनी उपोषण दोन दिवसांपासून सुरू केले असून दि.१९.०६.२०२४ रोजी सायंकाळी ६ वाजता जय भगवान महासंघाचे अध्यक्ष बाळासाहेब सानप यांनी उपोषणाला भेट दिली व यावेळी बोलतांना बाळासाहेब सानप म्हणाले की सर्व ओबीसी समाज एकत्रित आल्याने जरांगे पाटील यांच्या पाया खालची वाळू सरकली आहे मागण्या मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांना कळवु आशी गाव्ही दिली आहे..



दोन दिवसांपासून सुरू आसलेले उपोषणाला कापशीचे माजी सरपंच आश्रूबा गोल्हार व हातोला येथील मच्छिंद्र गर्जे उपोषणाला बसले आहेत यावेळी पंचक्रोशीतील २५ गावच्या सरपंचानी या उपोषणाला पाठिंबा दिला असून उपोषणाला भाजपाचे नेते मा.आ.भीमराव धोंडे, समाजसेवक विजय गोल्हार,जय भगवान महासंघाचे अध्यक्ष बाळासाहेब सानप, मच्छिंद्र गर्जे,आश्रूबा गोल्हार, पोपट गर्जे, नितीन नाकाडे, गहिनीनाथ गर्जे,कारभारी केदार, उध्दव कुत्तरवाडे,कुंडलिक ढाकणे, नामदेव सानप, रामभाऊ कुत्तरवाडे, अंबादास राख व पंचक्रोशीतील सरपंच यांनी या उपोषणाला पाठिंबा दिला . बाळासाहेब सानप बोलतांना म्हणाले की जो पर्यंत आमचे बांधव लक्ष्मण हाके यांच्या उपोषणाची सरकार दखल खेत नाही तोपर्यंत हातोला येथिल उपोषण सुरू ठेवणार आहेत सरकारने तात्काळ उपोषण स्थळी जालना जिल्ह्यात भेट देऊन आमच्या भावना समजून घ्यावेत व आमच्या ओबीसी आरक्षणाला कसला ही धक्का लागत नाही हे सरकारने लेखी द्यावे आम्ही आमच्या ओबीसी मधून कोणालाच आरक्षण मिळून देणार नाहीत आजून आम्ही ओबीसी शांत आहोत आमच्या भावनेचा उद्रेक होण्या अगोदर सरकारने आमच्या उपोषणाची दखल घ्यावी गेली दोन दिवस झाले आमचे उपोषण सुरू केले आमचे सहकारी उपोषणकर्ते मच्छिंद्र गर्जे यांची तब्येत खालवत असून उद्या काही बरे वाईट झाले तर यास सर्व:शि सरकार जबाबदार राहिल.. पेरणीचे दिवस आसता देखील सर्व आम्ही शेतकरी बाध्वांनी पेरणी थांबून उपोषणाला बसलो आहोत..

## भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार सोहळ्याचे आयोजन

बीड ।प्रतिनिधी

भारतीय बौद्ध महासभा बीड शहर शाखेच्या वतीने राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त बीड शहरातील व परिसरातील दहावी व बारावी परीक्षेमध्ये यश मिळवलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा बुधवार दिनांक २६ जून २०२४ रोजी सायंकाळी ५ वाजता डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे आयोजित करण्यात आला आहे.

यासाठी विद्यार्थ्यांनी त्यांच्या गुणपत्रिकेची प्रत भारतीय बौद्ध महासभेच्या पदाधिकारी यांच्याकडे जमा करणे आवश्यक आहे.

तरी सर्व गुणवंत विद्यार्थ्यांनी आपल्या गुणपत्रिकेची झेरॉक्स प्रत ही संयोजक ड.केतन गायकवाड शहराध्यक्ष ९२२६३६४४१६, यशवंत कदम तालुकाध्यक्ष ९८५०५३६१३२, संदेश डोळस तालुका सरचिटणीस ८६००९३४९९६ संतोष जोगदंड ९८६०५४३६२२, दिपक कांबळे ९८६०४७६२२८, यांच्या नंबर वर संपर्क साधून किंवा व्हाट्सअप द्वारे दिनांक २४ जूनपर्यंत आपण जमा करू शकतात. असे आवाहन भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने करण्यात आले आहे

## तरुणीला पोलिस भरतीचे आमिष; बीड एसपींच्या तत्कालीन स्टेनोसह चौघांवर गुन्हा

बीड ।प्रतिनिधी

पोलिस दलात भरती करून देतो, असे म्हणत बीडमधील एका अनाथ तरुणीकडून १ लाख रुपये उकळले. त्यातील १७ हजार रुपये परत केले. परंतु राहिलेले ८३ हजार रुपये परत न करता शिवीगाळ करून फसवणूक केली. याप्रकरणी बीडचे पोलिस अधीक्षक यांचे तत्कालीन स्टेनो सुरेश काथार यांच्यासह चौघांविरोधात बीड शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. सुरेश काथार, संजय कुलकर्णी, पंढरी जायनुरे आणि चिंतन गारगोटे, अशी गुन्हा दाखल झालेल्या आरोपींची नावे आहेत.बीड शहरातील २५ वर्षीय तरुणी पोलिस भरतीची तयारी करत आहे. तिची एप्रिल २०२३ मध्ये जिल्हा रुग्णालयात संजय कुलकर्णी यांच्यासोबत ओळख झाली. त्यांनी पोलिस अधीक्षक यांचे तत्कालीन स्टेनो सुरेश काथार यांच्यासोबत २४ एप्रिल २०२३ रोजी ओळख करून दिली. काथार यांनी नांदेडच्या पंढरी जायनुरे/मिसे याचा संपर्क क्रमांक दिला आणि ५० हजार रुपये द्यावे लागतील, असे सांगितले. त्यानंतर त्यांच्यात संवाद होत राहिला. याच दरम्यान तरूणीने मुंबई शहरची पोलिस भरती परीक्षा दिली होती. चांगले गुण असतानाही तिला प्रतीक्षेत ठेवले. त्यामुळे तिने पंढरीला कॉल करून मी काही करता येते का पाहा, असे सांगितले. त्यानंतर पंढरीने तिला जून २०२३मध्ये पुणे येथे बोलावले. तेथे चिंतन हनुमंत गारगोटे हा टी करप्शन ब्यूरोचा अधिकारी आहे, असे सांगून ओळख करून दिली. यावेळी त्याने आगोदर दोन मुलांचे १० लाख रुपये घेऊन काम केल्याचे दाखवले. परंतु तू मुलगी असल्याने तू पाच लाख रुपये दे, असे सांगितले. परंतु पैसे नसल्याने तरूणीने परत बीड गाठले. तरीही त्यांचे कॉल चालूच राहिले. त्यांनी एक लाख रुपयांची मागणी केली. यावर तरूणीने पुणे येथे जाऊन त्यांना ते पैसे दिले. काही दिवसांनी मुंबई शहरची अंतिम यादी लागली. यामध्ये तरूणीचे नाव नव्हते. यावर तिने विचारले असता सर्वांनीच उडवाउडवीची उत्तरे दिली. त्यानंतर काही दिवसांनी पंढरी याने १७ हजार रुपये फोन पेवर परत पाठविले तर २५ हजार रुपयांचा चेक दिला. परंतु हा चेक वटला नाही. त्यानंतर वारंवार संपर्क करून पैसे मागितल्यावरही ते दिले नाहीत. उलट शिवीगाळ केली. त्यामुळे आपली ८३ हजार रुपयांची फसवणूक झाल्याचा आरोप करत तरूणीने बीड शहर पोलिस ठाणे गाठून चौघांविरोधात फिर्याद दिली.

सुरेश काथार हे बीडमध्ये असताना वादग्रस्त ठरले. अनेक अधिकाऱ्यांनी त्यांच्याविरोधात पोलिस अधीक्षकांकडे तक्रारी केल्या होत्या. २०२३ मध्येच काथार हे सेवा निवृत्त झाले आहेत. कार्यरत असतानाच त्यांनी तरुणीला आमिष दाखवून फसवणूक केल्याचा आरोप आहे. आता त्यांच्यावर गुन्हा दाखल झाल्याने खळबळ उडाली आहे.

## महेश आयुर्वेद कॉलेज आष्टी तर्फे ज्येष्ठ नागरिक यांची मोफत तपासणी

आष्टी ।प्रतिनिधी

आष्टी येथील शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित महेश आयुर्वेद कॉलेज आष्टी यांच्यातर्फे दिनांक २०.०६.२०२४ रोजी माऊली मंदिर मुर्शदपुर आष्टी येथे आयुष्यमान आरोग्य मंदिर( -धणडक)अंतर्गत ज्येष्ठ नागरिक यांची मोफत तपासणी करण्यात आली ज्येष्ठ नागरिकांचे बीपी व रक्तातील साखर ,रक्तातील हिमोग्लोबिन ई.सी.जी ,डोळे तपासणी ,डायबेटिस ,हायपर टेन्शन ,हाडांचे आजार ,फुफ्फुसाचे आजार यांची मोफत तपासणी व



औषधोपचार करण्यात आले. महेश आयुर्वेद हॉस्पिटल मधील डॉक्टर मोहिनी गोसावी, डॉक्टर अक्षता इथापे ,डॉक्टर पूनम मार्कंडे यांनी तपासणी केली.रक्तातील सर्व तपासण्या लॅब टेक्निशियन विशाल गोरे ,अमृता गरगडे यांनी केल्या ,औषध वाटप फार्मासिस्ट सुमित खिलारे यांनी केले ,डॉक्टर संभाजी गोसावी यांनी आरोग्य विषयी माहिती व आहाराचे मार्गदर्शन केले. या प्रसंगी ११७ ज्येष्ठ नागरिक यांची मोफत तपासणी करण्यात आली व मोफत औषधोपचार देण्यात आले यावेळी महेश आयुर्वेद कॉलेजचे प्रथम वर्षातील सर्व विद्यार्थी व महेश आयुर्वेद हॉस्पिटल मधील इतर कर्मचारी उपस्थित होते या कार्यक्रमाचे नियोजन गौतम बोडखे यांनी केले

## योगक्रांती तुमच्या आयुष्यात आणेल सुख आणि शांती – तहसीलदार चंद्रकांत शेळके

अंबड ।प्रतिनिधी

२१ जून २०१५ रोजी पहिला आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा करण्यात आला. २०१५ रोजी योग दिनाची सुरुवात झाली, त्यानंतर जगभरात दरवर्षी २१ जून रोजी योग दिवस साजरा केला जातो. योग क्रांतीमुळे आरोग्य निरोगी राहून तुमच्या आयुष्यात सुख आणि शांती लाभेल असा आशावाद तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी व्यक्त केला आहे.

पुढे बोलताना ते म्हणाले की,योगा हे व्यक्तिमत्त्व विकासाचे अत्यंत प्रभावी शास्त्र आहे. योगीक क्रिया या व्यक्तिगत अनुभूतीचे शास्त्र आहे . योगाद्वारे शारीरिक , मानसिक व आत्मिक विकासातून व्यक्तीविकास होतो . समाज उभारणीसाठी , जीवन जगण्याची , विश्वशांती प्रस्थापित



करण्यासाठी अष्टांग योग हा महत्त्वपूर्ण ठरतो . यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान, समाधी यांद्वारे व्यक्तीला आपल्या अस्तित्वाचा पूर्णबोध होऊन जीवनाचे अंतिम सत्य समजते व व्यक्ती अष्टावधानी बनते.

## शिरुर कासार येथे सकल ओ.बी.सी.समाजाच्या साखळी उपोषणास आज पासून सुरुवात

वडीगोद्री ।प्रतिनिधी

तालुका अंबड,जिल्हा जालना येथे ओ.बी.सी.आरक्षण बचाव करण्यासाठी आमरण उपोषणास बसलेले ओ.बी.सी.योद्धा प्रा.लक्ष्मण हाके व नवनाथ वाघमारे हे गेल्या अनेक दिवसापासून अमरण उपोषण करत आहेत.त्यांना जाहीर पाठिंबा देण्यासाठी सकल ओ.बी.सी.समाज शिरुर कासार तालुका यांच्या वतीने दिनांक २१/०६/२०२४ रोजी शिरुर कासार शहरातील जिजामाता चौक येथे साखळी उपोषणाला सुरुवात होणार आहे.वडीगोद्री येथील आमरण उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी सकल ओ.बी.सी. समाज यांच्या वतीने शिरुर शिरुर कासार शहरातील जिजामाता चौक येथे सकाळी ९ वाजता या उपोषणाला लोक बसणार आहेत.मराठा समाजाला ओ.बी.सी.मधून आरक्षण देऊ नये म्हणून ओ.बी.सी.योद्धा प्रा.लक्ष्मण हाके व नवनाथ वाघमारे हे आमरण उपोषणास बसलेले आहेत.संपूर्ण महाराष्ट्र राज्यातून ओ.बी.सी हा या आंदोलणास पाठिंबा देत साखळी उपोषण करत आहे.शिरुर कासार तालुक्यातील प्रत्येक गाव दररोज या आंदोलनात भाग घेऊन साखळी उपोषण करणार आहेत.

## कर्नाटकातील कारखान्यांनी ३४टक्के वाढ द्यावी महाराष्ट्रातील मुकादम संघटनेची मागणी

प्रतिनिधी । धारूर

गतवर्षी झालेल्या कराराप्रमाणे ऊस तोड मुकादमांना महाराष्ट्रातील साखर कारखान्यांनी ३४ टक्के वाढ लागु केली. मात्र कर्नाटकातील एकाही साखर कारखान्याने ही वाढ केली नसल्याने ऊसतोड मुकादम यांनी आंदोलनाचे हत्यार उपासले असुन, यासाठी महाराष्ट्रातील मुकादमाची एक व्यापक बैठक भोगलवाडी फाट्यावर सिध्दी मंगल कार्यालयात गुरूवारी दुपारी पार पडली .या बैठकीस सर्व मुकादमांनी उपस्थिती लावली.

ऊसतोड मजूर, मुकादमांच्या आंदोलनासंदर्भात शासनाने गतवर्षी झालेल्या बैठकीत ऊसतोड मजूर व मुकादमांना ३४ टक्के दरवाढ केली. सदर दरवाढीची महाराष्ट्रातील सर्व साखर कारखान्यांनी दखल घेत याची अंमलबजावणी करून ऊसतोड मजुर व मुकादमांना ३४ टक्के दरवाढ लागु केली. मात्र बहुसंख्येने कर्नाटकात जाणाऱ्या या मजुर, मुकदमांना एकाही साखर कारखान्याने या निर्णयाची अंमलबजावणी केली नाही . तसेच दरवाढ ही केली नाही.

महाराष्ट्रातील मुकादम संघटनेतील प्रमुख मुकादमांनी ३४



टक्के वाढी प्रमाणे ऊस कामगारांना हिशोब दिला आहे . वाढीव रक्कम न दिल्यामुळे पुढील रणनीती ठरवण्यासाठी महाराष्ट्रातील सर्व ऊसतोड मुकादम यांची एक बैठक भोगलवाडी फाट्यावर सिध्दी मंगल कार्यालयात गुरुवार दि.२० जुन रोजी दुपारी एक वाजता पार पडली .या बैठकीस सर्व ऊसतोड मजूर, वाहतुकदार व मुकादमांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली . या बैठकीस लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे साहेब ऊसतोड मजुर, मुकादम व वाहतुकदार संघटनेचे संजय तिडके, तुकाराम तिडके, गोरक्षनाथ रसाळ, देवीदास तोंडे, सुग्रिव मुंडे, हनुमंत नागरगोजे, जयदेव तिडके, महादेव दराडे, कृष्णा तिडके, बंडु राठोड, विनायक मुंडे, बळीराम मुंडे, चंद्रकांत मुंडे, सोमेश्वर भूईटे ,विष्णु मोहिते, समशेर शेख, यांच्या सह मोठ्या संख्येने मुकादम या बैठकिस उपस्थीत होते.

# पंकजा मुंडे आणि महादेव जानकरांना पाडण्यासाठी मनोज जरागेंनी बैठका घेतल्या

## लक्ष्मण हाकेंचा मोठा आरोप

बीड - मनोज जरांगे पाटील यांच्या नादी लागून कितीतरी तरुणांनी आत्महत्या केल्या आहेत. व्यवस्थेनं मराठा समाज आणि तरुणांमध्ये संभ्रम निर्माण केला असल्याची टीका लक्ष्मण हाके यांनी केली आहे. लक्ष्मण हाके ओबीसी आरक्षणासाठी उपोषण करत आहेत. जरांगे यांनी पंकजा मुंडे आणि महादेव जानकर यांना पाडण्यासाठी बैठका लावल्याचा देखील हाके यांनी केला. हाके यांनी शरद पवारांवर सुद्धा टीका केली. पवार निवडणुका जिंकण्याचे फक्त मॅनेजमेंट गुरु असून त्यांनी इथले लोक सोबत घेतले असते, तर ते केव्हाच पंतप्रधान झाले असते असे देखील लक्ष्मण हाके यांनी म्हटलं आहे. यावेळी हाके यांनी मुख्यमंत्री झोपले आहेत. ते मीडिया बघत नाहीत, टीव्ही बघत नाहीत किंवा आंदोलन होत आहेत ते बघत नाहीत, अशी टीका त्यांनी केली.

लक्ष्मण हाके यांनी सांगितले की, आठव्या दिवसानंतर काल (१९ जून) जिल्हाधिकारी येऊन गेले. शासन अजून कुठं आहे अशी विचारणा त्यांनी केली. हाके यांनी सांगितले की, मराठा समाजातील उपेक्षित घटक हा फक्त इकॉनॉमिकल मागास आहे. आरक्षण एक केवळ सामाजिक मागासांचा प्रतिनिधित्व करत आहे. मराठा समाजातील तरुणांना माझी विनंती आहे की शासनाकडून योजना घेऊ शकतात पॉलिसी घेऊ शकतात.

आमचा माणूस आमदार नाही, खासदार नाही म्हणून तुलना केली का?



जरांगेंच्या नादी लागून कितीतरी तरुणांनी आत्महत्या केल्या आहेत. मात्र, व्यवस्था आणि प्रतिनिधी या तरुणांना समजून सांगत नाही हे सामाजिक मागासालेपणाचे आरक्षण आहे. त्यामुळे तरुणांच्या मनातला संभ्रम दूर केला पाहिजे. जरांगे फक्त तुलना करत आहे, तुमची पोरं नोकरी लागतात आमची का लागत नाही? आम्ही कधी आमचा माणूस आमदार नाही खासदार नाही म्हणून तुलना केली का? त्यांनी सांगितले की, तुमच्या जमिनी गेल्या म्हणता आणि बाराबलुतेदारांकडे जमिनी तरी आहेत का? सातबारा तरी आहे का? जरांगे तू यार लोकसभेला पंकजा मुंडेंना पाडण्यासाठी बैठका घेतल्या. गेल्या ७८ वर्षात धनगरांचा एकही खासदार झाला नाही, तरी त्या महादेव जानकर यांचा पराभव करण्यासाठी तू बैठका घेतल्या. प्रकाश आंबेडकर आनंदराज आंबेडकर यांना तुझे मत झाले नाही. भंपक माणसाच्या मागे जनता कशाला जाईल काय योगदान आहे त्यांचं? अशी विचारणा त्यांनी केली.

प्रकाश आंबेडकरांची आणि शेतकरी नेत्यांची हयात गेली आहे. जरांगे सारख्यांनी तरुणांच्या मनात भ्रम निर्माण केलेला आहे. अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांनी बनिग्रोची गुडघ्यावर बसून माफी मागितली होती. जगातील सुपर पॉवरबद्दल निग्रो बद्दल त्यांची ही भावना असेल तर माझ्या देशातील ज्यकर्त्यांची दलित भटक्या नुकतांबद्दल काय भावना असायला हवी? अशी विचारणा त्यांनी केली.

निवडणुका जिंकायचे फक्त मॅनेजमेंट गुरु

हाके यांनी शरद पवार यांच्यावरही टीका केली. शरद पवार यांना आम्ही जाणता राजा म्हणायचो, पण आता ते निवडणुका जिंकायचे फक्त मॅनेजमेंट गुरु आहे. पहिल्यांदा शरद पवार लक्ष्मण माने, ना. धो महानोहर यांच ऐकायचे. मात्र, आता काही ऐकत नाहीत. त्यांनी इथल्या लोकांना बरोबर घेतल असतं, तर ते कधीच पंतप्रधान झाले असते. आठ पैकी त्यांचे किती ओबीसी उमेदवार आहेत, जे आहे ते फक्त नावाला असल्याची टीका त्यांनी केली.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT